मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दि. 23 जून 2026 | पान- 1

# मोठ्या सोसायट्यांचा ओला कचरा न उचलण्याच्या निर्णयाला स्थगिती द्या

## आमदार शंकर जगताप यांची महापालिकेकडे मागणी, 1 जुलैपासून कारवाईला विरोध



**पिंपरी | प्रतिनिधी**

शंभर किलोहून अधिक ओला कचरा निर्माण करणाऱ्या पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील गृहनिर्माण संस्थांमधील कचरा एक जुलैपासून न उचलण्याच्या निर्णयाला स्थगिती द्यावी. दंडात्मक कारवाई करू नये,' अशी सूचना चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांनी महापालिका प्रशासनाला केली.

महापालिका प्रशासनाने घनकचरा व्यवस्थापनांतर्गत गृहनिर्माण संस्था व व्यावसायिक आस्थापनांना नोटिसा पाठवण्यास सुरुवात केली आहे. या पार्श्वभूमीवर, आमदार जगताप यांनी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची भेट घेतली. तूर्तास या निर्णयाची अंमलबजावणी करू नये, अशी सूचना त्यांनी केली. 'शाश्वत कचरा व्यवस्थापनाच्या दृष्टीने महापालिकेचे पाऊल स्वागतार्ह आहे. मात्र, या नियमांच्या अंमलबजावणीबाबत नागरिक, गृहनिर्माण संस्था आणि व्यावसायिक आस्थापना यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणावर संभ्रम, अस्वस्थता आणि असंतोष आहे. अनेक गृहनिर्माण संस्थांकडे ओला कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्यासाठी आवश्यक जागा, तांत्रिक मनुष्यबळ व आर्थिक क्षमता उपलब्ध नाही.

अशा परिस्थितीत थेट दंडात्मक किंवा फौजदारी कारवाईचा बडगा उचलल्यास नागरिकांमध्ये नकारात्मक भावना वाढीस लागेल. त्यामुळे महापालिकेने प्रस्तावित केलेली दंडात्मक व फौजदारी स्वरूपाची कठोर कारवाई तूर्तास स्थगित करावी. नियमांची अंमलबजावणी करण्यापूर्वी सर्व संबंधित घटकांशी चर्चा करून व्यापक जनजागृती मोहीम राबवावी आणि स्पष्ट मार्गदर्शक सूचना प्रकाशित कराव्यात. व्यावहारिक कृती आराखडा जाहीर करावा,' अशी मागणी आमदार जगताप यांनी केली.

### एक जुलैपासून ओला कचरा उचलणार नाही

» कंपोस्ट खतनिर्मिती प्रकल्प तयार करण्यासाठी हाऊसिंग सोसायट्यांना मार्गदर्शन करण्यात येत आहेत. दुर्गंधी निर्माण न होता, कशा प्रकारे खत निर्मिती केली जाते, याची माहिती दिली जात आहे. त्याला काही सोसायट्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. त्या प्रकल्पाची केंद्राच्या प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या पोर्टलवर नोंदणीही करण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या नियमानुसार तसेच, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार एक जुलैपासून मोठ्या सोसायट्यांचा ओला कचरा उचलला जाणार नाही. खत निर्मिती न करणाऱ्यांवर प्रथम दंडात्मक कारवाई, त्यानंतर फौजदारी गुन्हे दाखल केली जाणार आहेत, असे महापालिकेच्या आरोग्य विभागाचे उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी सांगितले.


### शंभर सदनिका असलेल्या सोसायट्यांना नियम लागू


» एकत्रीत बांधकाम व विकास नियमावलीनुसार (युडीसीपीआर) वीस हजार चौरस मीटर पुढील क्षेत्रफळावरील शंभर सदनिका आणि दररोज ४० हजार लिटर व त्यापेक्षा अधिक पाण्याचा वापर करणाऱ्या हाऊसिंग सोसाट्यांना पाण्याचा पुनर्वापर करणे बंधनकारक आहे. त्यासाठी सोसायटीच्या आवारात एसटीपी उभारणे सक्तीचे केले आहे. तसेच, दररोज शंभर किलो कचरा निर्माण करणाऱ्या सोसायटीला कंपोस्ट खत निर्मिती प्रकल्प उभारणे बंधनकारक केले आहे. त्यात सोसायट्यांसह मंगल कार्यालय, शैक्षणिक संस्था, कॅण्टीन, कंपन्या, हॉटेल, रेस्टारंट, मॉल, वसतीगृह, खाणावळ आदींचाही समावेश आहे.

---

# वडगाव मावळ रिंगरोड प्रकल्पाला गती; उर्से खिंडीत बोगदा, उड्डाणपुलाचे काम युद्धपातळीवर

## वडगाव-उर्से दरम्यान बोगदा आणि एमआयडीसी परिसरातील कनेक्टिव्हिटी मजबूत होणार





**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यात सुरू असलेल्या रिंगरोड प्रकल्पाचे काम अत्यंत जलद गतीने सुरू असून, या प्रकल्पाचा प्रमुख भाग असलेले वडगाव मावळ येथील महामार्गावर उड्डाणपूल व उर्से खिंडीतील बोगद्याचे कामही युद्धपातळीवर सुरू असल्याचे दिसते

पुणे ,पिंपरी चिंचवड या महानगरांना वळसा घालणारा रिंगरोड मावळ तालुक्यातील चांदखेड, परंदवडी, उर्से, वडगाव मावळ, कातवी, नानोलीतर्फे चाकण, आकुर्डी, आंबी, सुदुंबरे, सुदवडी या गावांमधून जातो. संबंधित गावांमध्ये संपादन प्रक्रिया पूर्ण झाली असून, प्रत्यक्ष कामही जलदगतीने सुरू आहे.

यामध्ये प्रामुख्याने वडगाव मावळ व उर्से गावच्या हद्दीत एक बोगदा असून, दोन्ही बाजूंनी या बोगद्याचे काम सुरू आहे. वडगाव मावळ बाजूने बोगद्याच्या प्रवेशद्वाराचे काम झाले असून आतमध्ये अत्याधुनिक मशिनद्वारे होल मारून, ब्लास्टिंग करून बोगदा तयार करण्यात येणार आहे. दुसरीकडे उर्से बाजूने खोदकाम सुरू करण्यात आले आहे. हा बोगदा वडगाव फाटा ते उर्से गावाला जोडणाऱ्या उर्से खिंडीतील रस्त्याखालून जात आहे.

वडगाव, कातवी भागातून हा रिंगरोड एमआयडीसी रस्त्यालगत जात असून, वडगाव येथे मुंबई पुणे महामार्गावर उड्डाणपुलाने पलीकडे जाणार आहे. याभागात खोदकाम, पिलर उभे करण्याचे काम सुरू आहे.

पुढे विशेषतः इंदोरी, सुदुंबरे, सुदवडी या भागामध्ये मात्र काम अंतिम टप्प्यात आहे. दरम्यान, वडगाव मावळ येथे उर्से खिंडीखालून जाणारा बोगदा, मुंबई पुणे महामार्ग येथे उड्डाण पूल, वडगाव शहराचे प्रवेशद्वार ते वडगाव फाटा या भागात रिंगरोड, एमआयडीसी रोड, तळेगाव - चाकण रस्ता या रस्त्याच्या जाळ्यांमुळे चित्रच बदलून जाणार असल्याचे दिसते.

# अशुद्ध पाणीपुरवठा करणाऱ्या टँकर चालकांवर कारवाई करा : खासदार श्रीरंग बारणे

## अस्वच्छ पाणी, वाढते दर आणि विस्कळीत पुरवठ्यावर संताप; पाणीपुरवठा व्यवस्थेतील त्रुटींवर प्रशासनाला धारेवर

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात टँकरने मोठ्या प्रमाणात पाणीपुरवठा केला जातो. टँकर चालक हे पाणी कोठून घेतात, ते पिण्यायोग्य आहे का याची चौकशी करावी. पैसे जास्त घेऊन सोसायटीधारकांना आर्थिक बुर्दंड टाकला जातो. सोसायटीधारकांची लूट थांबवावी. त्यासाठी टँकर चालकांवर निर्बंध आणावेत. त्यांची नोंद ठेवावी. स्वच्छ पाणी न दिल्यास टँकर चालकांवर कारवाई करण्याची सूचना शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी महापालिका प्रशासनाला केली आहे. तसेच इतर विकास कामांबाबत काटकसर करावी. पाणीपुरवठ्याच्या कामांवर भर देऊन ही कामे तत्काळ पूर्ण करावीत. याबाबत आयुक्त आणि महापौरांशीही चर्चा करणार असल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले.



शहरात चार दिवसांपासून पाणी कपात करण्यात आली. विस्कळीत पाणीपुरवठ्याच्या तक्रारींमध्ये वाढ झाल्याने खासदार बारणे यांनी सोमवारी महापालिका अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेतली. अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, नागसेविक सुलभा उबाळे, ऐश्वर्या तरस, नगरसेवक निलेश तरस, राजेंद्र तरस, पाणीपुरवठा विभागाचे सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी, कार्यकारी अभियंता महेश बरिदे, विजयसिंह भोसले, सुनिल अहिरे, कनिष्ठ अभियंता अनिश ओक उपस्थित होते. दरम्यान, खासदार श्रीरंग बारणे यांनी गेल्या आठ वर्षात पवना धरणातील एक लाख क्युबिक मीटर गाळ काढल्याने दीड महिना पुरेल एवढा पाणीसाठा उपलब्ध झाला. एक टीएसी पाणीसाठा वाढला आहे. त्यामुळे उन्हाळ्यात पाण्याची तीव्र टंचाई जाणवली नाही. शासनाची कोणतीही मदत न घेता खासदार बारणे यांनी लोकसहभागातून हा गाळ काढला. अन्यथा गंभीर पाणी टंचाईला सामोरे जावे लागले असते.

खासदार बारणे म्हणाले, कमी दाबाने, अस्वच्छ पाणीपुरवठ्याच्या तक्रारींमध्ये वाढ झाली आहे. समान पाणीपुरवठा होत नाही. काही ठिकाणी जास्त, काही ठिकाणी कमी तर काही ठिकाणी पाणी येतच नाही. पाणी समान वाटपासाठी स्काडा प्रणाली बसविली. मीटर बदलले. जलवाहिनी बदलली. पाण्याच्या टाक्या सर्वाधिक उभारल्या. ३० टक्के पाणी गळती होत आहे. अनधिकृतपणे नळजोड घेतले जातात. ते रोखण्यात प्रशासनाला अपयश आले आहे. नियोजनशून्य कारभारामुळे पाणी समस्या कायम आहे. प्रशासन उशिरा जागे झाले आहे. पाणी काटकसरीचे नियोजन अगोदरच करणे अपेक्षित होते. पाणी बचतीचे वर्षभर नियोजन करावे. स्वच्छ पाणीपुरवठ्यासाठी आत्तापासूनच तयारी करावी. महापालिका अशुद्ध पाणी उपसा करित असलेला नदी पात्राचा परिसर अतिशय अस्वच्छ आहे. तेथील नदीपात्र स्वचछ करावे. मुळशी धरणातून अतिरिक्त सात टीएमसी पाणी आणण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करावा.

### एसटीपी चालू की बंद यावर देखरेख ठेवावी..

» शहरातील ४९४ सोसायट्यांपैकी ३६९ सोसायट्यांमधील एसटीपी चालू आहेत. १२५ सोसायट्यांमधील एसटीपी बंद आहेत. सोसायट्यांमधील एसटीपी चालू आहेत की नाही यावर निगराणी ठेवावी. एसटीपीतील पाणी वाहने धुने, उद्यानासाठी वापरण्याकरिता नागरिकांना प्रोत्साहित करावे. जुन्या सोसायट्यांना एसटीपी उभारणे शक्य नाही. तिथे महापालिकेने लहान एसीटीपी उभारण्याचा प्रयत्न करावा, अशी सूचनाही खासदार बारणे यांनी केली.

### बंद जलवाहिनीचे पाईप काढले

» पवना बंदिस्त जलवाहिनीची कोट्यवधी रुपये खर्च करुन टाकलेली पाईपलाईन किवळेतील कैवल्य सोसायटी आणि सेंटीयोगा या दोन सोसायट्यांनी बांधकाम परवानगी विभागाच्या संगनमतानी काढली आहे. ही बाब अतिशय गंभीर आहे. त्यामुळे महापालिकेचे कोट्यवधीचे रुपयांचे नुकसान झाले आहे. यामध्ये कोण आहे, त्याचा शोध घ्यावा आणि कठोर कारवाई करावी अशी सूचना खासदार बारणे यांनी केली.

# पिंपरी-चिंचवड “आयआयएम” शाखा उभारणीला “बुस्टर”

## कॅबिनेट मंत्रीमंडळ बैठकीत निशुल्क जागा प्रस्तावाला मान्यता; भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या मागणीला मोठे यश

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड आणि परिसरातील विद्यार्थ्यांसाठी एक अत्यंत आनंदाची आणि अभिमानास्पद बातमी आहे. शहरात ‘इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट’ (IIM) ची शाखा उभारणीला मोठा ‘बुस्टर’ मिळाला असून, राज्य सरकारच्या कॅबिनेट मंत्रीमंडळ बैठकीत या संस्थेसाठी मोशी येथील शासकीय जागा निशुल्क देण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे. भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी यासंदर्भात केलेल्या सातत्यपूर्ण मागणीला आणि पाठपुराव्याला मोठे यश आले आहे.




आयआयएम नागपूरची विस्तारीत शाखा पिंपरी-चिंचवडमधील मोशी येथे व्हावी, यासाठी आमदार महेश लांडगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे. महानगरपालिका, जिल्हाधिकारी कार्यालय आणि महसूल विभाग यांनी यासाठी आधीच सकारात्मकता दर्शवली होती. आता राज्य सरकारच्या कॅबिनेट मंजुरीमुळे या भव्य प्रकल्पाचा मार्ग मोकळा झाला आहे.

पिंपरी-चिंचवड, पुणे आणि मुंबई ही मोठी शहरे जवळ असल्याने, तसेच येथील विशाल औद्योगिक पट्टा आणि आयटी हबचा विचार करता ‘कनेक्टिव्हिटी’च्या दृष्टीने मोशी येथील जागेची निवड करण्यात आली आहे. या वाढत्या नागरीकरणात राष्ट्रीय पातळीवरील व्यवस्थापन संस्था (IIM) शहरात येणे हे पिंपरी-चिंचवडच्या वैभवात भर घालणारे ठरणार आहे.

> “पिंपरी-चिंचवडला देशातील अग्रगण्य ‘एज्युकेशन हब’ (Education Hub) बनवणे हा आमचा संकल्प आहे आणि ‘आयआयएम’ (IIM) च्या रूपाने या संकल्पाला आज सर्वात मोठे बळ मिळाले आहे. आपल्या शहरात ही राष्ट्रीय स्तरावरील संस्था सुरू व्हावी, यासाठी मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी सुरुवातीपासूनच आम्हास सकारात्मक पाठबळ दिले आणि कॅबिनेट बैठकीत निशुल्क जागा मंजूर करून या स्वप्नाला गती दिली आहे. उद्योग, आयटी आणि उच्च शिक्षण यांचा हा त्रिवेणी संगम शहराच्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी ठरेल!”
>
> - महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी- चिंचवड, पुणे.

# अखेर पुणेकर सुखावले... ढगांच्या गडगडाटासह पावसाच्या सरी!

## यंदाच्या मोसमी पावसावर प्रशांत महासागरात सक्रीय झालेल्या एल निनोचे सावट राहण्याची शक्यता आहे

**पुणे | प्रतिनिधी**

मोसमी पावसाच्या चार महिन्यांतील पहिला पंधरवडा कोरडा गेला. पावसाळा सुरू होऊनही पावसाचे आगमन होत नसल्याने पुणेकरांना पावसाची तीव्र ओढ निर्माण झाली होती. अखेरीस रविवारी दुपारी ढगांच्या गडगडाटासह पावसाळ्यातील पहिल्या सरी बरसल्या असून, पुणेकर सुखावले आहेत.

यंदाच्या मोसमी पावसावर प्रशांत महासागरात सक्रीय झालेल्या एल निनोचे सावट राहण्याची शक्यता आहे. हवामान विभागानेही सरासरीपेक्षा कमी पावसाचा दीर्घकालीन अंदाज वर्तवला आहे. गेल्या वर्षी मे महिन्यातच मोसमी वारे पुण्यात दाखल झाले होते. त्यामुळे पावसाळा सुरू होण्यापूर्वीच जोरदार पावसाची नोंद झाली होती.

यंदा केरळमध्ये तीन दिवस उशीराने ४ जून रोजी केरळमध्ये दाखल झालेल्या मोसमी वाऱ्यांनी आगेकूच करत ७ जूनपर्यंत तळकोकणात मजल मारली. मात्र, त्यानंतर अनुकूल स्थिती नसल्याने मोसमी वाऱ्यांची प्रगती मंदावली. त्यामुळे १० जूनपर्यंत राज्यातसर्वदूर पोहोचण्याचे वेळापत्रक चुकले. इतकेच नाही, तर जूनमध्ये उन्हाळ्यासारखा उष्मा अनुभवावा लागत होता. लांबलेल्या पावसामुळे पाण्याच्या नियोजनाच्या दृष्टीने पुणे महापालिकेकडून पाणी वापरावर निर्बंध जाहीर केले आहेत.

या पार्श्वभूमीवर, रविवारी दुपारी दोननंतर अचानक आकाश भरून आले, काही वेळातच पावसाला सुरुवात झाली. तसेच ढगांचा गडगडाटही होऊ लागला. संथ लयीत पावसाच्या सरी पडू लागल्या. अचानक आलेल्या पावसामुळे रस्त्यावरील दुचाकी चालकांना भिजावे लागले. काहींना आडोसा घ्यावा लागला. मात्र, त्याचवेळी खूप प्रतीक्षा करून पाऊस आल्याने खूश झालेल्या बच्चेकंपनीने पहिल्या पावसात भिजण्याचा आनंद घेतला.

दरम्यान, भारतीय हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार राज्यात १ ते २० जून या कालावधीत पावसाची तूट निर्माण झाली आहे. मात्र, पुण्यासह घाट परिसरातही पावसाला सुरुवात झाली आहे.



### एल निनोमुळे पावसाचा वेग मंदावला

**» यंदा मोसमी वाऱ्यांचे आगमन केरळमध्ये ४ जूनला झाले असले तरी पुढील वाटचाल अपेक्षेप्रमाणे वेगाने झाली नाही. प्रशांत महासागरातील एल निनो प्रभावामुळे मोसमी वाऱ्यांची प्रगती मंदावल्याचे हवामान तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे. परिणामी राज्यात आणि पुणे परिसरात पावसाचे आगमन उशिराने झाले. भारतीय हवामान विभागानेही यंदा सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे जून महिन्यातही उन्हाळ्यासारखे वातावरण अनुभवावे लागले आणि जलसाठ्यांवरील ताण वाढला.**

### प्रतीक्षेनंतर पावसाची हजेरी

**» पावसाळा सुरू होऊनही जूनचा पहिला पंधरवडा कोरडा गेल्याने पुणेकरांना पावसाची प्रतीक्षा लागली होती. अखेर रविवारी दुपारी अचानक वातावरणात बदल झाला आणि ढगांच्या गडगडाटासह पावसाने हजेरी लावली. संथ पण समाधानकारक सरींनी शहराला दिलासा दिला. रस्त्यांवर नागरिकांनी पावसाचे स्वागत केले, तर उष्णतेने हैराण झालेल्यांना मोठा दिलासा मिळाला. दीर्घ प्रतीक्षेनंतर आलेल्या या पावसामुळे शहरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून पाणीटंचाईच्या चिंतेतही काही प्रमाणात घट झाली आहे.**

### धरणक्षेत्रातही पाऊसाची हजेर

**» गेल्या दोन आठवड्यांच्या प्रतीक्षेनंतर झालेल्या या दमदार आगमनाने पुणेकरांना मोठा दिलासा मिळाला आहे. विशेषतः धरण क्षेत्रातही अशाच स्वरूपाचा पाऊस झाल्यास पाणीकपातीचे संकट कमी होण्यास मदत होणार आहे. दुपारच्या हलक्या शिडकाव्याने हुलकावणी दिल्यानंतर सायंकाळी झालेल्या या दमदार बरसातीने मात्र पुणेकरांच्या चेहऱ्यावर खऱ्या अर्थाने समाधानाचे हास्य फुलविले. आता सर्वांच्या नजरा मान्सूनच्या पुढील वाटचालीकडे लागल्या आहेत.**

# रेल्वे फाटकमुक्तीच्या दिशेने, 'पीएमआरडीए'चे महत्त्वाचे पाऊल

## उड्डाणपूल आणि भुयारी मार्गांच्या जलद बांधकामासाठी सामंजस्य करार; प्रवासाचा वेळ, इंधन आणि वाहतूक कोंडी कमी होणार आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) क्षेत्रातील वाहतूककोंडी सोडविण्याच्या आणि रस्ते रेल्वे फाटकमुक्त करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार 'पीएमआरडीए' हद्दीतील रेल्वे उड्डाणपूल (आरओबी) आणि रेल्वे मार्गाखालील भुयारी मार्ग (आरयूबी) यांच्या जलद आणि दर्जेदार बांधकामासाठी 'पीएमआरडीए'ने 'महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड (महारेल) या कंपनीसोबत अधिकृत सामंजस्य करार केला आहे. या करारामुळे पुणे महानगर प्रदेश क्षेत्रातील वाहतूक कोंडी सुटण्यास मदत होणार आहे.

मुख्यमंत्री, 'पीएमआरडीए'चे अध्यक्ष देवेंद्र फडणवीस यांनी पुणे महानगर प्रदेशातील वाहतूककोंडीची समस्या गांभीर्याने घेत, रेल्वे फाटकमुक्तीसाठी विशेष पुढाकार घेतला. या संदर्भात पूर्वी झालेल्या बैठकांमध्ये रेल्वे मार्गावरील उड्डाणपूल, पादचारी पूल (एफओबी) आणि भुयारी मार्ग यांची कामे वेगवेगळ्या यंत्रणांमार्फत करण्याऐवजी, या कामांमध्ये तांत्रिक अनुभव असलेल्या 'महारेल' मार्फतच करून घ्यावीत, असे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार या प्रक्रियेला गती देण्यात आली आहे.

या आदेशानंतर 'पीएमआरडीए'अंतर्गत हे प्रकल्प 'महारेल' कडे सोपविण्याच्या दृष्टीने दोन्ही संस्थांमध्ये बैठका झाल्या. 'पीएमआरडीए'चे महानगर आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी सामंजस्य कराराचा मसुदा तातडीने अंतिम करण्याची सूचना दिली होती. त्यानुसार या मसुद्यावर दोन्ही बाजूंकडून स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. 'महारेल'चे व्यवस्थापकीय संचालक राजेशकुमार जयस्वाल आणि 'पीएमआरडीए'चे महानगर आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी या करारावर स्वाक्षरी केली. या वेळी 'पीएमआरडीए'चे मुख्य अभियंता (प्रभारी) शिवप्रसाद बागडी यांच्यासह दोन्ही संस्थांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



### मुख्यमंत्र्यांच्या पुढाकाराने प्रकल्पाला गती

**» पुणे महानगर प्रदेशातील वाढती वाहतूककोंडी आणि रेल्वे फाटकांमुळे निर्माण होणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष पुढाकार घेतला आहे. रेल्वे फाटकमुक्तीचा आराखडा प्रभावीपणे राबविण्यासाठी उड्डाणपूल, पादचारी पूल आणि भुयारी मार्गांची कामे तांत्रिकदृष्ट्या अनुभवी संस्थेकडे देण्याचे निर्देश त्यांनी दिले होते. त्यानुसार पीएमआरडीए आणि महारेल यांच्यात सामंजस्य करार झाला आहे. या निर्णयामुळे वाहतुकीचा वेग वाढण्यास मदत होणार असून पुणे महानगर प्रदेशातील विकासकामांना चालना मिळणार आहे.**

# फुरसुंगी-उरुळी देवाचीमध्ये ओपन डम्पिंगविरोधात ग्रामस्थ आक्रमक

## पुणे महापालिकेच्या कचरा टाकण्याच्या विरोधात कचरागाड्या अडवून ग्रामस्थांचा तीव्र संताप

**पुणे | प्रतिनिधी**

फुरसुंगी: फुरसुंगी-उरुळी देवाची परिसरात सुरू असलेल्या बेकायदेशीर ओपन डम्पिंगविरोधात ग्रामस्थ पुन्हा एकदा आक्रमक झाले आहेत. शहरातून आलेल्या कचऱ्याच्या गाड्या अडवून ग्रामस्थांनी महापालिका प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला. ओपन डम्पिंग कायद्याने बंद असतानाही भूमी ग्रीन कंपनीच्या जुन्या कार्यालयाशेजारी महापालिकेने सुमारे ८० हजार मेट्रिक टन कचरा टाकल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

महापालिका जुना कचरा टाकण्याच्या नावाखाली शहरातील विविध रॅम्पवरून थेट ताजा कचरा येथे आणत आहे. या कचऱ्यामध्ये टाकाऊ अन्न, ओला कचरा तसेच दुर्गंधीयुक्त कचऱ्याचा समावेश असल्याचे पाहणीत निदर्शनास आणले. वाहतूक करणाऱ्या ठेकेदारानेही हा कचरा शहरातून नुकताच आणण्यात आल्याची कबुली दिल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे.

ओल्या कचऱ्यामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे संतप्त ग्रामस्थांनी रविवारी सकाळी शहरातून आलेल्या कचरागाड्या रोखून परत पाठवल्या. या वेळी महापालिका प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. दरम्यान, ग्रामस्थांनी पुणे महापालिकेच्या घनकचरा विभागाचे उपायुक्त संतोष वारुळे यांच्याशी संपर्क साधून घटनास्थळी येऊन परिस्थितीची पाहणी करण्याची मागणी केली होती. वारुळे यांनी ग्रामस्थांची भेट घेण्याचे आश्वासन दिले होते.

मात्र, सायंकाळपर्यंत त्यांनी भेट दिली नसल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन महापालिकेविरोधात तक्रार दाखल करणार असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. या वेळी रणजित रासकर, विशाल हरपळे, ज्ञानेश्वर कामठे, कपिल भाडळे, विराज करचे, भूपेंद्र बेंगळे, नगरसेवक अॅड. अमोल कापरे, अजिंक्य ढमाळ, सनी कांबळे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.



### ओपन डम्पिंगविरोधात ग्रामस्थांचा एल्गार

» फुरसुंगी-उरुळी देवाची परिसरात सुरू असलेल्या कथित बेकायदेशीर ओपन डम्पिंगविरोधात ग्रामस्थ पुन्हा एकदा रस्त्यावर उतरले. शहरातून आलेल्या कचरागाड्या अडवून त्यांनी पुणे महापालिका प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला. ओपन डम्पिंगला कायद्याने बंदी असतानाही भूमी ग्रीन कंपनीच्या जुन्या कार्यालयाशेजारी मोठ्या प्रमाणावर कचरा टाकला जात असल्याचा आरोप करण्यात आला. परिसरातील दुर्गंधी, प्रदूषण आणि आरोग्यविषयक धोक्यांमुळे नागरिकांमध्ये असंतोष वाढला असून प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

### महापालिकेवर गुन्हा दाखल करण्याची मागणी

» घनकचरा व्यवस्थापन नियमांनुसार ओपन डम्पिंगला बंदी असतानाही येथे कचरा टाकला जात असल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी फुरसुंगी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पुणे महापालिकेच्या घनकचरा विभागाचे उपायुक्त संतोष वारुळे यांनी घटनास्थळी भेट देण्याचे आश्वासन दिले होते; मात्र सायंकाळपर्यंत ते आले नसल्याची नाराजी ग्रामस्थांनी व्यक्त केली. आता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे अधिकृत तक्रार दाखल करून महापालिका प्रशासनावर गुन्हा नोंदविण्याची मागणी करण्यात येणार असल्याचे ग्रामस्थांनी स्पष्ट केले.

### ताजा कचरा टाकल्याचा गंभीर आरोप

» महापालिका जुना कचरा विल्हेवाटीच्या नावाखाली शहरातील विविध रॅम्पवरून थेट ताजा आणि ओला कचरा आणत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या कचऱ्यामध्ये टाकाऊ अन्नपदार्थ, ओला कचरा आणि दुर्गंधीयुक्त पदार्थांचा समावेश असल्याचे सांगण्यात आले. वाहतूक करणाऱ्या ठेकेदारानेही हा कचरा शहरातून नुकताच आणल्याची कबुली दिल्याचा दावा करण्यात आला. ओल्या कचऱ्यामुळे माशा, डास आणि दुर्गंधी वाढून नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होत असल्याने ग्रामस्थांनी कचरागाड्या परत पाठविल्या.

# पुण्यात स्कूल बस-व्हॅन तपासणी मोहीम सुरू; विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आरटीओची कडक कारवाई

## फिटनेस प्रमाणपत्र, कागदपत्रे आणि नियमभंग तपासणीसाठी विशेष मोहीम; रविवारीही आरटीओ कार्यालय सुरू ठेवण्याचा निर्णय

**पुणे | प्रतिनिधी**

वर्ष २०२६ सुरू झाले असून, शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक सुरक्षित व्हावी, यासाठी पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाने कंबर कसली आहे. पुणे शहर आणि जिल्ह्यातील सर्व स्कूल बस आणि स्कूल व्हॅन वाहनांची विशेष तपासणी मोहीम राबवण्याचे आदेश उप प्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्नील भोसले यांनी दिले आहेत.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने स्कूल बसची सर्व कागदपत्रे वैध असणे आवश्यक असून, दोषी वाहनांवर थेट मोटार वाहन अधिनियमांतर्गत कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

आरटीओ प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, अनेक स्कूल बस आणि व्हॅन चालकांचे वाहन योग्यता प्रमाणपत्र (फिटनेस सर्टिफिकीट) नूतनीकरण करण्याचे काम बाकी आहे. हे काम वेळेत पूर्ण व्हावे आणि शाळा सुरू असताना विद्यार्थ्यांची वाहतूक खंडित होऊ नये, यासाठी आरटीओ कार्यालयामार्फत दर रविवारी देखील योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरणाचे कामकाज सुरू ठेवण्यात आले आहे. स्कूल बस चालक आणि मालकांनी या सुविधेचा लाभ घेऊन आपल्या वाहनांची कागदपत्रे तातडीने वैध करून घ्यावीत, असे आवाहन आरटीओकडून करण्यात आले आहे.

केवळ कागदपत्रांची पूर्तता नव्हे, तर प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून नियम भंग करणाऱ्या स्कूल बस आणि स्कूल व्हॅनच्या तपासणीसाठी आरटीओने आता विशेष मोहीम हाती घेतली आहे. शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करताना वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या किंवा क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी भरणाऱ्या वाहनांवर थेट जागेवरच धडक कारवाई केली जाणार आहे. आरटीओच्या सर्व रस्ता सुरक्षा पथकांना यासंदर्भात स्पष्ट आदेश जारी करण्यात आले आहेत.



> शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षितता ही आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. शाळा सुरू झाल्यामुळे परिवहन नियमांचे पालन करणे सर्व शालेय वाहन चालकांसाठी बंधनकारक आहे. वाहनचालकांच्या सुविधेसाठी आम्ही रविवारीही आरटीओ कार्यालय सुरू ठेवून फिटनेस सर्टिफिकेट नूतनीकरणाची संधी दिली आहे. मात्र, यानंतरही जे चालक किंवा मालक रस्त्यावर नियम भंग करताना आढळतील, अशा स्कूल बस आणि स्कूल व्हॅनवर मोटार वाहन कायद्यानुसार अत्यंत कडक आणि धडक कारवाई केली जाईल. विद्यार्थ्यांच्या जिवाशी खेळ खपवून घेतला जाणार नाही..
>
> \- स्वप्नील भोसले, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे